**शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून राज्यात व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या नविन संस्था, नविन अभ्यासक्रम / प्रवेश क्षमता वाढीस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद ,नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**

**शासन निर्णय क्र.टीईएम-२०१६/प्र.क्र.२७०/तांशि-४**

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.

दिनांक: ०७ जुलै, २०१६

**वाचा :** संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय यांचे पत्र क्रमांक २/एनजीसी/ २०१६/६३९, दिनांक १७/५/२०१६

**प्रस्तावना :-**

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून राज्यात खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था व अभ्यासक्रमाची मान्यतेची यादी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून दिनांक ०६.०५.२०१५ रोजीच्या ई-मेल द्वारे तंत्र शिक्षण संचालनालयास प्राप्त झालेल्या यादीत नाहीत मात्र ज्या संस्थाना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने मान्यता दिली आहे व अशा संस्थांनी तंत्र शिक्षण संचालनालयास केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने वेलिंगकर इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँड रिसर्च , मुंबई या संस्थेस २ नवीन पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यास तसेच संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था, इस्लामपूर या संस्थेने दिनांक १२.०५.२०१६ च्या पत्रान्वये त्यांना नवीन फार्मसी अभ्यासक्रमाची संस्था सुरु करण्यास अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन संचालक, तंत्र शिक्षण यांनी उपरोक्त वाचा येथील पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता २०१५-१६ | प्रवेश क्षमता २०१६-१७ |
|---|---|---|---|---|
| १ | एस.पी. मंडळाचे वेंलिंगकर इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँड रिसर्च, माटुंगा, मुंबई ४०० ०१९ | पीजीडीएम (रिसर्च अँड बिझीनेस ॲनालिटीक्स) | ० | ६० |
| | | पीजीडीएम (मिडिया अँड इन्टरटेंटमेंट) | ० | ६० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था, इस्लामपूर यांचे आण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ फार्मसी आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली | फार्मसी पदवी (नवीन संस्था) | ० | ५० |

उपरोक्त संस्थांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे मान्यता दिलेली आहे मात्र अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी पाठविलेल्या ई-मेल मधील यादीमध्ये याचा अंतर्भाव नसल्याने संदर्भ यापूर्वीच्या प्रस्तावांमध्ये त्यांचा समावेश नाही. तरी उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या संस्थानी त्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या मान्यतेस अनुसरुन संचालक, तंत्र शिक्षण यांनी सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन वरील तक्त्यात नमूद संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे नवीन पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रम/ व्यावसायिक अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेचे प्रवेक्षक्षमता वर नमूद केल्याप्रमाणे राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य विद्यापीठ अधिनियम,१९९४ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक राहील.

५) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

६) सदर पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

७) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट,१९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया,नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

९) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

१०) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

११) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणेआवश्यक राहील.

१२) याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१३) दुसऱ्या पाळीसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी विहित केलेल्या/करावयाच्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

१४) ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१६०७०७१७३६२६२५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Madan Maruti Morve

Digitally signed by Madan Maruti Morve
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Madan Maruti Morve
Date: 2016.07.13 12:34:33 +05'30'

**(म. मा. मोरवे)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
३. संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. सर्व संबंधित संस्था (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
८. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण भाग), नवी दिल्ली.
९. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई
१०.निवड नस्ती/तांशि-४

**शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून राज्यात व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास/प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास/प्रवेशक्षमता पूर्ववत करण्यास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन मान्यता देणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र. टीईएम-२०१७/प्र.क्र.२१५/तांशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १५ मे, २०१७

**संदर्भ :** संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक २/एनजीसी/ मान्यता/ २०१७/५३५, दिनांक २९.०४.२०१७ व सहपत्रे

**प्रस्तावना :-**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून राज्यात व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था व नवीन अभ्यासक्रमाची दिनांक २५.०४.२०१७ रोजीच्या ई-मेल द्वारे तंत्र शिक्षण संचालनालयास प्राप्त झालेली यादीच्या अनुषंगाने संचालक, तंत्र शिक्षण यांनी संदर्भाधीन पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला आहे. प्रस्तुत प्रकरणी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन, संचालक, तंत्र शिक्षण यांनी सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे रिट याचिका क्रमांक ४५८६ /२०१५ बाबत दि. १४.०८.२०१५ मध्ये दिलेला न्यायालयीन निर्णय विचारात घेता, सोबत जोडलेल्या **प्रपत्र अ**-(Annexure A) व **प्रपत्र-ब** (Annexure B) मध्ये नमूद संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अनुक्रमे विद्यमान संस्थेत नवीन पदव्युत्तर पदवी व पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यास व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने थेट कमी केलेली प्रवेश क्षमता पूर्ववत केल्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन सोबत जोडलेल्या **प्रपत्र अ**-(Annexure A) व **प्रपत्र-ब** (Annexure B) मध्ये नमूद संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अनुक्रमे विद्यमान संस्थेत नवीन पदव्युत्तर पदवी व पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यास व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने थेट कमी केलेली प्रवेश क्षमता पूर्ववत करण्यास शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२.प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

३.शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४.सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक राहील.

५.संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

६.सदर पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

७.शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

८.संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट,१९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया,नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

९.संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

१०.संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

११.रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग अॅक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

१२.याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१३.ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतिम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०५१५१५१७२७६३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( डॉ.किरण पाटील )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व)
३. संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. सर्व संबंधित संस्था (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई

६. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
८. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण भाग), नवी दिल्ली.
९. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई
१०.निवड नस्ती/तांशि-४.

| Sr. No. | Institute Code | NAME OF THE INSTITUTE | INSTITUTE ADDRESS | INSTITUTE DISTRICT | INSTITUTE CITY | INSTITUTE TYPE | WOMEN INSTITUTE APPROVED | MINORITY INSTITUTE | PROGRAMME | AFFILIATING UNIVERSITY DEPARTMENT | LEVEL OF COURSE | COURSE | SHIFT | FULL TIME / PART TIME | APPROVED INTAKE 2016_17 | APPROVED INTAKE 2017_18 | Variation |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | 5160 | SANIVANI RURAL EDUCATION SOCIETY'S SANJIVANI COLLEGE OF ENGINEERING | AT: SAHAJANANDNAGAR POST- SHINGNAPUR TAL:-KOPARGAON DIST: AHMEDANAGR-423 603 | AHMEDNAGAR | KOPARGAON | Unaided - Private | No | No | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | ELECTRICAL ENGINEERING | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 | 60 |
| 2 | 3419 | SIR M VISVESVARAYA INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES AND RESEARCH | ROAD NO. 7A, SEWRI WADALA ESTATE, SCHEME NO. 57, WADALA(W), MUMBAI | MUMBAI CITY | MUMBAI | Unaided - Private | No | Yes | MANAGEMENT | Mumbai University, Mumbai | POST GRADUATE DIPLOMA | POST GRADUATE DIPLOMA IN MANAGEMENT (FINANCE) | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 | 60 |
| 3 | 3419 | SIR M VISVESVARAYA INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES AND RESEARCH | ROAD NO. 7A, SEWRI WADALA ESTATE, SCHEME NO. 57, WADALA(W), MUMBAI | MUMBAI CITY | MUMBAI | Unaided - Private | No | Yes | MANAGEMENT | Mumbai University, Mumbai | POST GRADUATE DIPLOMA | POST GRADUATE DIPLOMA IN MANAGEMENT (MARKETING) | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 | 60 |
| 4 | 2563 | RP COLLEGE OF PHARMACY(B.PHARMACY) | GUT NO. 253, ALANI, GADPATI. | OSMANABAD | ALANI | Unaided - Private | No | No | PHARMACY | Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 50 | 100 | 50 |
| 5 | 6141 | JSPM'S RAJARSHI SHAHU COLLEGE OF ENGINEERING | S. NO. 80, PUNE-MUMBAI BYPASS HIGHWAY, TATHAWADE, PUNE-411033 | PUNE | PUNE | Unaided - Private | No | No | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | ELECTRICAL ENGINEERING | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 | 60 |
| 6 | 6271 | SCTR'S PUNE INSTITUTE OF COMPUTER TECHNOLOGY | S.NO.27, PUNE SATARA ROAD, DHANKAWADI | PUNE | PUNE | Unaided - Private | No | No | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | INFORMATION TECHNOLOGY | 1st Shift | FULL TIME | 120 | 180 | 60 |
| 7 | 6141 | JSPM'S RAJARSHI SHAHU COLLEGE OF ENGINEERING | S. NO. 80, PUNE-MUMBAI BYPASS HIGHWAY, TATHAWADE, PUNE-411033 | PUNE | PUNE | Unaided - Private | No | No | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | INFORMATION TECHNOLOGY | 1st Shift | FULL TIME | 60 | 120 | 60 |
| 8 | 6109 | MAEER'S MIT SCHOOL OF MANAGEMENT. | SURVEY NO.123, SARASWATI VISHWA BUILDING, A WING, PAUD ROAD, KOTHRUD, PUNE. 411038. STATE MAHARASHTRA. | PUNE | PUNE | Unaided - Private | No | No | MANAGEMENT | University of Pune, Pune | POST GRADUATE | MASTERS IN BUSINESS ADMINISTRATION | 1st Shift | FULL TIME | 120 | 180 | 60 |
| 9 | 6893 | ANNASAHEB DANGE COLLEGE OF B PHARMACY | A/P - ASHTA, TAL - WALWA, DIST - SANGLI | SANGLI | ASHTA | Unaided - Private | No | No | PHARMACY | Shivaji University, Kolhapur | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 50 | 100 | 50 |

**फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच, विद्यमान पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास शासन मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्र.मान्यता-२०२४/प्र.क्र.३६५/तांशि-४**

मादाम कामा रोड, हुतात्मा चौक राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

**दिनांक: ३० सप्टेंबर, २०२४.**

**वाचा** : संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.२/पीसीआय-मान्यता/२०२४-२५/७८२, दि.२४.०९.२०२४.

**प्रस्तावना** : फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच, विद्यमान पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास, शासन मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, तंत्रशिक्षण यांनी वाचा येथील पत्रान्वये शासनास सादर केला आहे. त्यानुषंगाने शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन व संचालक, तंत्र शिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे, सोबतच्या प्रपत्रामध्ये दर्शविल्यानुसार विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच, विद्यमान पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:-**

१) सदर मान्यता ही कायम विनाअनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या तसेच दि.२१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

३) शासनाने विहित केलेल्या, तसेच, फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस, संचालक, तंत्र शिक्षण यांच्यासोबत करारनामा करावा लागेल. तसेच, आवश्यक कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार / पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास, त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास शिक्षक, शिक्षकेतर व इतर तांत्रिक कर्मचारी, फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या निकषाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत. वेतन व भत्ते इ. बाबत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून तसेच, संस्थेविरुध्द विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेने आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके फार्मसी कौंसिल ऑफ इंडियाच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच, विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच, फार्मसी कौंसिल ऑफ इंडियाच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९) रॅगिंग संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

१०) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि.२२.०२.२०१८ अन्वये विहित केलेले नोंदणी शुल्क संबंधित महाविद्यालय/संस्थेने भरणा केले नसेल, तर ते संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय यांनी संबंधित महाविद्यालय/ संस्थेकडून भरणा करुन घ्यावे.

११) महाविद्यालयाने/संस्थेने सदर अभ्यासक्रमाकरीता, संबंधित विद्यापिठाचे संलग्नीकरण प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

२. याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

३. या शासन मान्यतेनुसार उक्त संस्था / महाविद्यालयातील अभ्यासक्रमांचा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश होण्याकरिता संचालक, तंत्र शिक्षण यांनी आवश्यक ते आदेश निर्गमित करावेत.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०९३०१६३८०८७४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

THORAT AJITKUMAR ARUNRAO

Digitally signed by THORAT AJITKUMAR ARUNRAO
DN: CN = THORAT AJITKUMAR ARUNRAO, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2024.09.30 16:40:15 +05'30'

**( अजितकुमार थोरात )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
३) संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
४) कुलसचिव, संबंधित विद्यापीठ (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
५) संबंधित संस्था (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६) निवड नस्ती/तांशि-४

प्रपत्र

HTED G.R.No.Manyata-2024/C.R.365/TE-4, Dated: 30th September, 2024

List of Increase in Intake , New Course in existing Unaided Pharmacy Institute, Approved by PCI for A.Y. 2024-25

| Sr.No. | DTE CODE | PCI CODE | INSTITUTE NAME | STATUS | PROGRAMME | UNIVERSITY NAME | LEVEL OF COURSE | MAIN COURSE NAME | COURSE NAME | INTAKE APPROVED BY GOVT. A.Y. 2023-24 | INTAKE APPROVED BY PCI A.Y. 2024-25 | VARIATION | REMARKS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 5437 | PCI - 2505 | Trimurti Institute of Pharmacy, Paldhi BK., Tal.Dhamangaon, Dist.Jalgaon, Paldhi-425 103 | Un-Aided | PHARMACY | North Maharashtra University, Jalgaon | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmaceutical Quality Assurance | 6 | 9 | 3 | Increase in Intake |
| | | | | | | | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmaceutics | 0 | 3 | 3 | New Course |
| 2 | 6893 | PCI-2860 | Annasaheb Dange College of B Pharmacy, Ashta, Tal. Walwa, Dist Sangli, Ashta - 416 301 | Un-Aided | PHARMACY | Shivaji University Kolhapur | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmacology | 0 | 15 | 15 | New Course |
| | | | | | | | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmaceutics | 0 | 15 | 15 | New Course |
| 3 | 1295 | PCI-4060 | Karmayogi Tatyasaheb Bondre Institute of Pharmacy, Chikhli, Dist Buldana, Chikhli 443 201 | Un-Aided | PHARMACY | Sant Gadge Baba Amravati University Amravati | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmaceutics | 0 | 15 | 15 | New Course |
| 4 | 5281 | PCI - 2071 | Shree Mahavir Education Societys Mahavir Institute of Pharmacy, Varvandi 422 202 | Un-Aided | PHARMACY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmaceutical Quality Assurance | 0 | 15 | 15 | New Course |
| | | | | | | | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmaceutics | 0 | 15 | 15 | New Course |

THORAT AJITKUMAR ARUNRAO

Digitally signed by THORAT AJITKUMAR ARUNRAO
DN: CN = THORAT AJITKUMAR ARUNRAO, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2024.09.30 16:40:36 +05'30'

**शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राज्यातील विद्यमान खाजगी संस्थेत सुरु असलेल्या पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ, नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, विद्यमान पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करणे, पुर्वी कमी केलेली प्रवेश क्षमता पुर्ववत करणे, विद्यमान अभ्यासक्रम दुसऱ्या अभ्यासक्रमात विलिन करणेबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन मान्यता देणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्र.मान्यता-२०१८/(प्र.क्र.१३९/१८)तांशि-५**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
दिनांक: ०८ जून, २०१८.

**संदर्भ :** संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक १०/एनजीसी/मान्यता/२०१८/४५०, दिनांक १५.०५.२०१८.

**प्रस्तावना :-**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राज्यातील विद्यमान खाजगी संस्थेत सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ, नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, विद्यमान पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करणे, पुर्वी कमी केलेली प्रवेश क्षमता पुर्ववत करणे, विद्यमान अभ्यासक्रम दुसऱ्या अभ्यासक्रमात विलिन करण्यास संस्थांना मान्यता देण्यासंदर्भात दिनांक ०७.०५.२०१८ रोजीचा ई-मेल व तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना दिनांक १४.०५.२०१८ रोजीच प्राप्त झालेल्या दुसरी यादीचे अनुषंगाने संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय यांनी संदर्भीय पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केलेला आहे. सोबत जोडलेल्या Annexture A, Annexture B, Annexture C मध्ये नमुद संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ, नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, विद्यमान पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करणे, पुर्वी कमी केलेली प्रवेश क्षमता पुर्ववत करणे, विद्यमान अभ्यासक्रम दुसऱ्या अभ्यासक्रमात विलिन करण्यास शासन मान्यता देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन सोबत जोडलेल्या Annexture A, Annexture B, Annexture C मध्ये नमूद संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ, नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, विद्यमान पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करणे, पुर्वी कमी केलेली प्रवेश क्षमता पुर्ववत करणे, विद्यमान अभ्यासक्रम दुसऱ्या अभ्यासक्रमात विलिन करण्यास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.
२. प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेश क्षमता विवरणपत्रातील त्यांच्या नावासमोर नमूद केल्याप्रमाणे मर्यादित राहील.
३. शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.
४. सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक राहील.
५. सदर पदविका अभ्यासक्रमांसाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची संलग्नता घेणे आवश्यक आहे.
६. नव्याने मान्यता देण्यात आलेल्या पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थाप्रमुखांनी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी फार्मसी कौन्सील ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यता घेणे बंधनकारक राहील. सदर मान्यतेअभावी भविष्यात काही न्यायालयीन

प्रकरणे उदभवल्यास याप्रकरणी संबंधित संस्था पूर्णपणे जबाबदार राहतील. तसे हमीपत्र संबंधित संस्थाप्रमुखांनी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे सादर करावयाचे आहे. त्यानंतरच सदर संस्थांना अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी संचालनालयाने संमती द्यावयाची आहे.

७. संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे आवश्यक ते प्रक्रिया शुल्क व संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

८. सदर व्यावसायीक पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

९. महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ व त्याच्याअनुषंगाने वेळोवेळी निर्गमित होणारे नियम तथा आदेश संबंधित संस्थांना लागु राहतील.

१०.शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

११.संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

१२.संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

१३.सदर संस्था, संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, वांद्रे, मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.

१४.रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

१५.अभ्यासक्रमात बदल झाल्यामुळे/अभ्यासक्रम बंद झाल्यामुळे भविष्यात जी काही परिस्थीती उद्भवते त्यास संबंधित संस्था जबाबदार राहतील. याप्रमाणे तसे हमीपत्र संबंधित संस्थांनी द्यावयाचे आहे.

१६.याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१७.ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०६०८११३६२१४००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(अ.र.काटकर)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई
३. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई /पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५. सर्व संबंधित संस्था (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई

७. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
९. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
१०.फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया, कम्बाइन्ड काऊन्सिल्स् बिल्डिंग, कोटला रोड, एजवान-इ-गालिब मार्ग, नवी दिल्ली-११० ००२.
११.सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण भाग), नवी दिल्ली.
१२.विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई
१३.निवड नस्ती/तांशि-५.

शासन निर्णय क्र.मान्यता-2018/(प्र.क्र.139/18)तांशि-5, दिनांक 08 जून, 2018 सोबतचे

# Annexure B

## List of Diploma Pharmacy Course in Existing Degree Pharmacy Institute, Approved by AICTE for A.Y. 2018-19

| Sr. No. | Institute Code | Current Application Number | Permanent ID | Institute Name | Institute Address | District | Institution Type | Program | University/ Board | Level of Course | Course Name | Shift | Full Time/ Part Time | Intake Approved for 2017-18 | Intake Approved for 2018-19 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 5197 | 1-3515246036 | 1-5375226 | S.N.D.COLLEGEOF PHARMACY | AT/POST-BABHULGAON TAL-YEOLA DIST-NASHIK PIN-423401 | NASHIK | Unaided - Private | PHARMACY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 |
| 8 | 5446 | 1-3507976848 | 1-3351201574 | MATOSHRI MIRATAI AHER COLLEGE OF PHARMACY | VITTHAL NAGAR,KOKATE VASTI,KARJULE HARYA TAL.PARNER DIST.AHMEDNAGAR | AHMEDNAGAR | Unaided - Private | PHARMACY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 |
| 9 | 6380 | 1-3508241694 | 1-5865043 | MARATHWADA MITRA MANDAL'S COLLEGE OF PHARMACY | S. NO.4/17,SECTOR NO.34, PCNTDA, OFF KALEWADI PHATA-PIMPRI ROAD, THERGAON (KALEWADI) | PUNE | Unaided - Private | PHARMACY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 |
| 10 | 6893 | 1-3508346490 | 1-2858009941 | ANNASAHEB DANGE COLLEGE OF B PHARMACY | A/P - ASHTA, TAL - WALWA, DIST - SANGLI | SANGLI | Unaided - Private | PHARMACY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 |
| 11 | 6907 | 1-3508820597 | 1-3370517421 | SAROJINI COLLEGE OF PHARMACY | 576, RAJENDRANAGAR , KOLHAPUR | KOLHAPUR | Unaided - Private | PHARMACY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 |